जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2025
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विशेष व्याख्यानाच्या प्रारंभी गुरुवारी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा सत्कार प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुस्तकभेट देऊन करण्यात आला. यावेळी डावीकडून डॉ. पी. बी. बिलावर, डी. बी. सुतार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

# विद्यार्थ्यांनी वाचन व्यवहार समजून घ्यावा : डॉ. लवटे

## शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान

कोल्हापूर, ता. ९ : 'वाचन प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव करते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचन व्यवहार समजून घ्यावा. वैचारिक वाचन साहित्याची गरज व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक आहे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रातर्फे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या मोहिमेंतर्गत आयोजित 'वाचनाची विस्तारित क्षितिजे' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातील या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी कौशल्य आधारित शिक्षण प्रणाली, तसेच राष्ट्र विकासामध्ये तरुणांचे वाचनाद्वारे योगदान वर्धित करता येते, असे नमूद केले. विद्यार्थ्यांनी क्रमिक पुस्तकांबरोबर अवांतर वाचन करावे, असे आवाहन केले. डॉ. शरद बनसोडे, सचिनकुमार पाटील, प्रल्हाद माने, युवराज जाधव आदी उपस्थित होते. ज्ञान स्रोत केंद्राचे प्र-संचालक डॉ. डी. बी. सुतार यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांनी करून दिला. सुधाराणी हजारे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. डॉ. शिवराज थोरात यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2025
लोकमत


# वाचन हे व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक

## सुनीलकुमार लवटे : विद्यापीठात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : वाचन तुटले तर, व्यक्ती सांस्कृतिकदृष्ट्या रोडावते. त्यामुळे वाचन व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी गुरुवारी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राच्यावतीने डॉ. लवटे यांचे 'वाचनाची विस्तारित क्षितिजे' या विषयावर राजर्षी शाहू सभागृहात व्याख्यान झाले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे कार्यक्रमास उपस्थित होते.

डॉ. लवटे म्हणाले की, वाचन हे ज्ञानामृत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचन अधाशीपणे करावे. विद्यार्थ्यांनी वाचन व्यवहार समजून घ्यावा. वाचनातून होणारी बौद्धिक



समृद्धी महत्त्वाची तसेच वाचनामुळे सांस्कृतिक श्रेष्ठता वाढीस लागते. ग्रंथवाचनासोबत विद्यार्थ्यांनी सभोवतालचा निसर्ग, जंगल, व्यक्ती इ. सर्व गोष्टींचे वाचन करणे आवश्यक आहे. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राचे प्र-संचालक डॉ. डी. बी. सुतार यांनी स्वागत, डॉ. पी. बी. बिलावर यांनी परिचय करून दिला. सुधाराणी हजारे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. शिवराज थोरात, डॉ. शरद बनसोडे, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. युवराज जाधव उपस्थित होते.

10 JAN 2025 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाचनाने सांस्कृतिक श्रेष्ठता वाढीस लागते

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठमध्ये व्याख्यान



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना डॉ. सुनिलकुमार लवटे. सोबत डॉ. डी. बी. सुतार, डॉ. पी. बी. बिलावर, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विद्यार्थ्यांमध्ये वाचन वाढत गेल्यास त्यांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव करते. विद्यार्थ्यांनी वाचन व्यवहार समजून घ्यावा. वैचारिक वाचन साहित्याची गरज व्यक्तिमत्व विकासाकरिता आवश्यक आहे. वाचनातून होणारी बौद्धिक समृद्धी महत्त्वाची असतेच पण वाचनामुळे सांस्कृतीक श्रेष्ठता वाढीस लागते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा मोहिमेंतर्गत आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'वाचनाची विस्तारित क्षितिजे' हा त्यांच्या वाचनाचा विषय होता. राजर्षी शाहू सभागृहातील व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

डॉ. लवटे म्हणाले, वाचन तुटले तर, व्यक्ती सांस्कृतिक दृष्ट्या रोडावते. त्यामुळे वाचन व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक आहे. ग्रंथवाचनासोबत विद्यार्थ्यांनी सभोवतालचा निसर्ग, जंगल, व्यक्तींचे वाचन करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी वाचनाचा परिघ वाढवून विश्वव्यापी ज्ञान मिळवले पाहिजे. अध्यक्षस्थानावरून प्र.-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, कौशल्य आधारीत शिक्षण प्रणाली तसेच राष्ट्र विकासामध्ये तरुणांचे वाचनाद्वारे योगदान वर्धित करता येते. वाचनाचे व्यक्तीच्या जडणघडणीमध्ये अतिशय महत्व आहे. विद्यार्थ्यांनी क्रमिक पुस्तकांबरोबर अवांतर वाचन करावे.

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. डी. बी. सुतार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय उप-ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांनी करून दिला. सूत्रसंचालन सुधाराणी हजारे यांनी केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी सहाय्यक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात, डॉ. शरद बनसोडे, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. युवराज जाधव होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 20
पुढारी

# जागतिक हिंदी दिवसानिमित्त शिवाजी विद्यापीठात आज विविध कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जागतिक हिंदी दिवसानिमित्त शिवाजी विद्यापीठातील निलांबरी सभागृहात शुक्रवारी (दि. १०) व्याख्यानमाला व आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी निबंध स्पर्धेतील विजेत्यांच्या गौरव व राजभाषा सन्मान पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. डॉ. पल्लवी कुलकर्णी, डॉ. प्रदीप भिंगार्डे आरोग्यविषयक मार्गदर्शन तर दस्तगीर मुल्ला यांचे आगीपासून सुरक्षेवर प्रात्यक्षिक दाखविणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठातील हिंदी-पर्यावरण अधिविभाग, शिव सहाय्यता व आपत्ती व्यवस्थापन केंद्र व युको बँकेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानमालेत व्हाईट आर्मीचे संस्थापक अध्यक्ष अशोक रोकडे मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JAN 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठामध्ये बीबीए-एमबीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रम सुरु

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये शैक्षणिक सत्र २०२४-२५ पासून बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी नवीन पाच वर्षीय बीबीए-एमबीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. एआयसीटीई मान्यताप्राप्त हा अभ्यासक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना बीबीए पदवी व एमबीए पदव्युत्तर पदवी मिळविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. राज्य सामाईक प्रवेश प्रक्रिया कक्षामार्फत घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. २ जानेवारीपासून प्रवेशासाठी नावनोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. १० फेब्रुवारीला नोंदणी प्रक्रिया पूर्ण होणार आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी एमबीए विभागाशी संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी www. mahacet. org संकेतस्थळास भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.